MHNS180010112020

| | | |
|---|---|---|
| दाखल तारीख | : | ०६.१०.२०२० |
| नोंदणी तारीख | : | ०६.१०.२०२० |
| निकाल तारीख | : | ०७.०४.२०२६ |
| कालावधी | : | ०५ वर्षे ०६ महिने ०१दिवस |
| निशाणी | | **५२** |

**कळवण येथील सह न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, यांचे न्यायालयात**

**ता. कळवण, जिल्हा– नाशिक.**

(पिठासन अधिकारी – श्री. व्ही.बि.चव्हाण)

**नियमीत फौजदारी खटला क्रं. ९२/२०२०.**

गुन्हा नोंद क्र.४७/२०२०

**फिर्यादी/तक्रारदार** **महाराष्ट्र शासन तर्फे**
**पोलीस निरीक्षक,**
कळवण पोलीस स्टेशन,
ता. कळवण, जि. नाशिक

**अभियोग पक्षातर्फे** सहाय्यक सरकारी अभियोक्ता
श्री.एस.जे.बडे.

**आरोपी**
१. एकनाथ नामदेव बच्छाव, वय ६५ वर्षे,
२. विमलबाई एकनाथ बच्छाव, वय, ५५ वर्षे,
३. नरेंद्र एकनाथ बच्छाव, वय ३२ वर्षे,(मयत)
४. सविता नरेंद्र बच्छाव, २७ वर्षे,
नवीबेज, ता.कळवण, जि.नाशिक.

**आरोपींतर्फे विधीज्ञ** श्री.एन.एन.वाघ वकिल.

**भाग – ब**

(फौजदारी आदेशिकाचे प्रकरण VI मधील परिच्छेद ४४ (ii) अन्वये)

| | | |
|---|---|---|
| गुन्हा घडल्याचा दिनांक | :– | २५.०६.२०२० |
| फिर्याद दाखल दिनांक | :– | ०१.०७.२०२० |

| | | |
|---|---|---|
| दोषारोपपत्र पाठविल्याचा दिनांक | :– | २२.०९.२०२० |
| दोषारोप निश्चित केल्याचा दिनांक | :– | १०.१०.२०२३ |
| पुरावा सुरु झाल्याचा दिनांक | :– | १०.०३.२०२६ |
| न्यायनिर्णयासाठी प्रकरण राखून ठेवल्याचा दिनांक | :– | ०७.०४.२०२६ |
| न्यायनिर्णय दिनांक | :– | ०७.०४.२०२६ |
| न्यायनिर्णयातील शिक्षेसंदर्भात आदेशाचा दिनांक | :– | निरंक. |

## आरोपीची माहिती

| आरोपी क्र. | आरोपीचे नांव | अटक दिनांक | जामिनावर सोडल्याचा दिनांक | गुन्हयाचे कलम | अंतिम आदेश | शिक्षा | फौ.प्र.सं. कलम ४२८ अन्वये समायोजित (set off) करण्या बाबत कलावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १.<br>२.<br>३.<br>४. | एकनाथ नामदेव बच्छाव<br>विमलबाई एकनाथ बच्छाव<br>नरेंद्र एकनाथ बच्छाव(मयत)<br>सविता नरेंद्र बच्छाव | १६.०७.२० | १६.०७.२० | भादवी कलम ३२४, ३२३ सह कलम ३४ प्रमाणे | निर्दोष मुक्त | नाही | नाही |

## भाग – क

(फौजदारी आदेशिकाचे प्रकरण VI मधील परिच्छेद ४४ (iii) अन्वये)

**सरकारपक्षातर्फे देण्यात आलेले साक्षीदार/बचाव पक्षातर्फे साक्षीदार/ न्यायालयीन साक्षीदार**

**अ. अभियोगपक्ष –**

| सा.क्र. | साक्षीदाराचे नांव | स्वरुप | निशाणी |
|---|---|---|---|
| १. | बाळु देवा बच्छाव | फिर्यादी | ४३ |
| २ | नागेश बाळु बच्छाव | साक्षीदार | ४५ |
| ३. | दिनेश बाळु बच्छाव | साक्षीदार | ४६ |
| ४. | सुरेखा बाळु बच्छाव | साक्षीदार | ४७ |

**ब. आरोपीतर्फे साक्षीदार**

| सा.क्र. | साक्षीदाराचे नांव | स्वरुप | निशाणी |
|---|---|---|---|
| –– | –– | –– | –– |

**क. न्यायालयामार्फत निशाणी (फक्त आवश्यक कागदोपत्री पुरावा)**

| अ.क्र. | निशाणी क्र. | वर्णन |
|---|---|---|
| १. | १ | दोषारोपपत्र |
| २. | ४४/अभियोग साक्षीदार क्र. १ | फिर्यादीची फिर्यादवरील सही |

**ड. आरोपीमार्फत निशाणी (फक्त आवश्यक कागदोपत्री पुरावा)**

| अ.क्र. | निशाणी क्र. | वर्णन |
|---|---|---|
| १. | ४८ | घटनास्थळ पंचनामा |
| २. | ४९ | वैद्यकिय प्रमाणपत्र |
| ३. | ५० | वैद्यकिय प्रमाणपत्र |

**ड. मुद्देमाल**

| अ.क्र. | आर्टीकल | वर्णन |
|---|---|---|
| १. | लोखंडी कोयता | एम.आर नं.५८/२०२० |

**न्यायनिर्णय**

**(घोषणा तारीख– ०७ एप्रिल २०२६.)**

प्रस्तूतचा खटला आरोपींविरुध्द भारतीय दंड संहिता, १८६० चे कलम ३२४, ३२३ सह कलम ३४ या अपराधासाठी चालविण्यात आला.

२. **अभियोगपक्षाची हकिकत थोडक्यात खालीलप्रमाणे आहे.**

दि.२५.०६.२०२० रोजी सकाळी १०.०० वाजेच्या सुमारास फिर्यादी, त्यांची पत्नी सुरेखा, मुले दिनेश व नागेश असे त्यांच्या नवी बेज गावालगत घराजवळील खळवाडीच्या मोकळया जागेत तारकंपाउंड करण्यासाठी पहार, टिकाव, फावडयाने खड्डे खोदण्याचे काम व कोयत्याने वडांग तोडण्याचे काम करत असतांना सायंकाळी ६.३० वाजेच्या सुमारास सर्व आरोपी येवुन फिर्यादी व साक्षीदारांना 'तुम्ही आमच्या खळवाडीचे जागेत तार कंपाउंडचे खड्डे का खोदतात' असे बोलल्याने फिर्यादीने त्यांना समजावुन

सांगितले की, आम्ही तार कंपाउंड करण्यासाठी आमच्या खळवाडीचे जागेत खड्डे केले आहे' असे सांगण्याचा आरोपींना राग येवुन त्यांनी फिर्यादी व साक्षीदारांना शिवीगाळ करुन लाथाबुक्क्यांनी मारहाण करु लागले. त्यावेळी विमलबाईने तिच्या हातातील कोयत्याने फिर्यादीच्या डाव्या हाताच्या पंजावर मारल्याने हाताचे रक्त निघुन दुखापत झाली व बाकीच्या आरोपींनी फिर्यादीची पत्नी व मुलांना लाथाबुक्क्यांनी व हाताचे चापटीने मारहाण करुन शिवीगाळ करत असतांना मुलगा नागेश यास नरेंद्रने लाथाबुक्क्यांनी मारहाण करुन पाठीवर डावे बाजुस चावा घेतला. त्यानंतर आरोपींनी त्यांना शिवीगाळ करत त्यांच्या घराकडे निघुन गेले. सदर भांडणामध्ये फिर्यादीला हाताच्या पंजाला, खांद्याला, बरगडीला मार लागुन दुखापत झाली व मुलगा नागेशच्या हातापायास मुक्कामार लागुन पाठीवर डावे बाजुस चचावा घेतल्याने जखम झाली. तसेच इतरांना मुक्कामार लागल्याने ते लगेच पोलिसस्टेशनला फिर्याद देण्यासाठी आले. त्यानंतर पोलिसांनी त्यांना कळवण येथील सरकारी दवाखान्यात औषधोपचारासाठी कळवण येथील सरकारी दवाखान्याचे नावाने मेडिकल यादी दिली. तेथे फिर्यादीवर प्राथमिक उपचार केले. परंतु फिर्यादीची तब्येत जास्त बिघडल्याने त्यांना सिव्हील हॉस्पीटल नाशिक येथे दाखल केले. त्यानंतर फिर्यादीने कळवण पोलिसस्टेशनला फिर्याद दाखल केली.

३. सदरची फिर्याद गुन्हा रजिस्टर नंबर ४७/२०२०, भारतीय दंड संहिता, १८६० चे कलम ३२४, ३२३, ५०४, ५०६ सह कलम ३४ अन्वये नोंदविण्यात आला. गुन्हयाचा तपास पूर्ण झाल्यानंतर न्यायालयात आरोपींविरुध्द दोषारोपपत्र दाखल केले. माझे पुर्वपिठासीन अधिकारी यांनी आरोपी नं. १, २ व ४ विरुध्द (निशाणी २९) भा.द.वि कलम ३२४, ३२३ सह कलम ३४ अन्वये दोषारोप नोंदविला. आरोपींनी गुन्हा कबुल नसल्याचे निवेदन देऊन सुनावणीला सामोरे जाण्याची तयारी दर्शवली.

४. आरोपींविरुध्द पुरावा न आल्याने त्यांचे फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम ३१३ प्रमाणे निवेदन नोंदविण्यात आले नाही.

५. अभिलेख, पुरावे पाहता, सदर प्रकरणात निकालासाठी खालील मुद्दे

निघतात, ते मुद्दे व त्यांचे निष्कर्ष कारणांसहित खालीलप्रमाणे आहेत.

| अ.नं. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | अभियोगपक्षाने हे शाबीत केले आहे काय, आरोपींनी संगनमत करुन आरोपी नं.२ ने फिर्यादीला तिच्या हातातील कोयत्याने डाव्या हाताच्या पंजावर मारुन इच्छापुर्वक दुखापत केली? | .. **नकारार्थी.** |
| २. | अभियोगपक्षाने हे शाबीत केले आहे काय, आरोपींनी संगनमत करुन फिर्यादी व साक्षीदारांना हाताचापटीने व लाथाबुक्क्यांनी मारहाण करुन किरकोळ दुखापत केली ? | |
| ३. | काय आदेश ? | **अंतिम आदेशाप्रमाणे.** |

## कारणे

६. अभियोगपक्षातर्फे श्री. एस.जे.बडे व आरोपींतर्फे श्री. एन.एन.वाघ यांचा युक्तीवाद ऐकला. आरोपींतर्फे विधीज्ञ श्री.एन.एन.वाघ यांनी अभियोगपक्षाने आरोपींविरुध्द संशयापलीकडे गुन्हा शाबीत केला नाही असा युक्तीवाद करुन आरोपींना निर्दोष मुक्त करण्याची विंनती केली आहे.

### मुद्दा क्रमांक १ व २ करिता –

७. सर्व मुद्दे हे परस्पर संलग्न असल्यामुळे त्यांचे विवेचन एकत्रितरित्या केलेले आहे. सदर प्रकरणात फिर्यादीमधील मजकूर शाबीत करण्यासाठी अभियोगपक्षाने फिर्यादी बाळु देवा बच्छाव (सा.क्र.१), नागेश बाळु बच्छाव (सा.क्र.२), दिनेश बाळु बच्छाव (सा.क्र.३) व सुरेखा बाळु बच्छाव (सा.क्र.४) यांची साक्ष नोंदवली आहे.

८. फिर्यादी बाळु देवा बच्छाव (सा.क्र.१) यांच्या पुराव्यात असे आले आहे की, आरोपी त्यांचे नातेवाईक असुन ते त्यांच्या खळशेजारी राहायला आहेत, घटना २५ तारखेला ६ व्या महिन्यात ५ ते ६ वर्षापुर्वी नवी बेज येथील त्यांच्या खळजागेत घडली

होती, परंतु घटना नेमकी कधी घडली होती हे त्यांना सांगता येणार नसल्याचे सांगितले आहे, त्यावेळी त्यांची व आरोपींची बोलाबाली झाली होती, त्याव्यतिरीक्त इतर काहीही घडले नसल्याचे सांगितले आहे. त्यानंतर त्यांनी पोलिसस्टेशनला फिर्याद दिली होती परंतु त्यातील मजकुर त्यांनी सांगितलेला नसुन त्यावर फक्त सही केल्याचे कथन केले आहे.

९. नागेश बाळु बच्छाव (सा.क्र.२) व दिनेश बाळु बच्छाव (सा.क्र.३) यांनी त्यांच्या पुराव्यात आरोपी त्यांचे नातेवाईक असुन घटना ५ ते ६ वर्षापुर्वी नवी बेज येथील त्यांच्या खळयात घडली होती, परंतु घटना काय घडली हे त्यांना सांगता येत नसल्याचे कथन केले आहे. तसेच सुरेखा बाळु बच्छाव (सा.क्र.४) यांनी त्यांच्या पुराव्यात ते आरोपींना त्या ओळखत नाही व ते कुठे राहतात हेही त्यांना सांगता येत नसल्याचे, तसेच घटना कधी व कोठे घडली हे त्यांना सांगता येणार नसल्याचे कथन केले आहे. फिर्यादी व इतर साक्षीदारांनी अभियोगपक्षास सहाय्य केले नाही त्यामुळे त्यांनी फिर्यादी व साक्षीदारांना अभियोगपक्षाने उत्तरसुचक प्रश्न विचारले. परंतु त्यांच्या उत्तरांमधून आरोपींविरुध्द कोणताही पुरावा पटलावर आला नाही. त्यानंतर फिर्यादीला त्याच्या फिर्यादमधील अधोरेखांकित भाग अ व साक्षीदारांना त्यांच्या जबाबातील अधोरेखांकित भाग अ वाचुन दाखविला. परंतु तो त्यांच्या फिर्याद व जबाबात का नमुद आहे याचे कारण ते सांगु शकत नसल्याचे सांगितले आहे. त्यानंतर फिर्यादी व साक्षीदारांची आरोपींसोबत न्यायालयाबाहेर तडजोड झाल्याचे सांगितले आहे.

१०. फिर्यादीच्या व साक्षीदारांच्या उत्तरसुचक प्रश्नामध्ये त्यांचेमध्ये व आरोपींमध्ये तडजोड झाल्याचे कबुल केले आहे. एकंदरीत फिर्यादी व साक्षीदारांच्या पुराव्यावरुन समजुत पुरसीस वरुन आरोपी व साक्षीदारांमध्ये तडजोड झाल्याचे दिसुन येते. त्यामुळे आरोपींनी संगनमत करुन आरोपी नं. २ ने फिर्यादीला हातातील कोयत्याने डाव्या हाताच्या पंजावर मारहाण करुन इच्छापुर्वक दुखापत केली, तसेच सर्व आरोपींनी फिर्यादी व साक्षीदारांना हाताचापटीने व लाथाबुक्क्यांनी मारहाण करुन किरकोळ दुखापत केली ही बाब संशयापलीकडे सिध्द होत नाही. त्यामुळे मी मुद्या क्र. १ व २ चे उत्तर नकारार्थी नोंदविले असून मुद्दा क्र. ३ करीता खालील आदेश पारीत करीत आहे.

**: <u>आदेश</u> :**

१. आरोपी नं. १, २ व ४ यांना फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २४८(१) नुसार भारतीय दंड संहिता, १८६० चे कलम ३२४, ३२३ सह कलम ३४ खाली शिक्षापात्र असलेल्या आरोपांतुन निर्दोष मुक्तता करण्यात येते.

२. आरोपी नं.३ हा मयत झाला असल्याने त्याच्याविरुध्द दि. ०८.०८.२०२३ रोजी प्रकरण अबेट करण्यात आले आहे.

३. आरोपींचा जामीन मुचलका रद्द करण्यात येतो.

४. आरोपींना फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ कलम ४३७–अ प्रमाणे प्रत्येकी रक्कम रु. १५,०००/– च्या जामीनावर सोडण्यात येते. अपील कालावधीनंतर आरोपींचा जामीन हा आपोआप रद्य होईल.

५. जप्त मुद्देमाल एक लोखंडी कोयता हा मुल्यहीन असल्याने नष्ट करण्यात यावा.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषीत)

VISHWAJIT BIPINCHANDRA CHAVAN

Digitally signed by VISHWAJIT BIPINCHANDRA CHAVAN
Date: 2026.04.07 17:23:01 +0530

दिनांकः ०७.०४.२०२६.

**(व्ही.बि.चव्हाण)**

सह न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, कळवण.